**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. एमडीएफ/516/जन दिनांक - 29.05.2023

परिपत्रक

**विषय:** सार्वजनिक गणेशोत्सव 2023 मूर्तीकारांच्या मंडपांचे शुल्क आकारणी करण्याबाबत सुधारित मार्गदर्शीका.

**संदर्भ:** 1) क्र. एमडीएफ/ओडी/3881/जन, दिनांक 01.03.2023 अन्वयेचे परिपत्रक.

2) मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 16.05.2023 रोजी आयोजित करण्यात आलेली बैठक.

3) क्र. एमडीएफ/ओडी/436/जन दिनांक 19.05.2023 अन्वयेचे परिपत्रक.

4) एमजीसी/एफ/9789 दि. 26.05.2023

विषयांकित प्रकरणी सन 2023 च्या सार्वजनिक गणेशोत्सवांदरम्यान मूर्तीकारांच्या मंडप उभारणीबाबत उपरोक्त संदर्भ क्र.1 अन्वयेच्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. सदर मार्गदर्शक सुचनांत अन्य सुचनासह शुल्क आकारणीची सुचना नमुद होती. मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 16.05.2023 रोजी दुपारी 03.00 वाजता आयोजित केलेल्या बैठकीत यावर्षी गणेशोत्सवांदरम्यान मंडपांसाठी शुल्क आकारणी करू नये असे निर्देश दिले आहेत. तदनुसार गणेशोत्सव 2023 करिता मूर्तिकारांच्या शुल्क व अनामत रक्कम पूर्णपणे माफ करण्यात येईल. ज्या मूर्तीकारांनी अगोदरच परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/3881/जन, दिनांक – 01.03.2023 नुसार शुल्क व अनामत रक्कमेचा भरणा केला असेल त्यांना सदर शुल्काचा/ अनामत रक्कमेचा परतावा विभाग कार्यालयामार्फत करण्यात येईल, याबाबतच्या सूचना उपरोक्त संदर्भ क्र. 3 अन्वये निर्गमित करण्यात आल्या होत्या.

सदर परिपत्रकात अंशत: बदल करुन असे निर्देश देण्यात येत आहेत की, मूर्तीकार / साठवणूकदार / गणेशोत्सव मंडळ यांना मंडप उभारणीसाठी विनाशुल्क परवानगी द्यावयाची आहे. मात्र त्यांजकडून रु.1000/- फक्त एवढी अनामत रक्कम स्वीकारावयाची आहे. सदर अनामत रक्कमेचा परतावा उत्सव पूर्ण झाल्यानंतर विहित कार्यापद्धतीचे अवलंबन करुन विभाग कार्यालयाने त्वरीत करावयाचा आहे.

परिपत्रक क्र. एमडीएफ/ओडी/3881/जन, दिनांक – 01.03.2023 मध्ये नमूद अन्य सुचनांमध्ये काहीही बदल नाही.

| | | |
|---|---|---|
| **सही/- 25.05.2023** | **सही/- 25.05.2023** | **सही/- 26.05.2023** |
| **उप आयुक्त (परि.-दोन)** | **अतिरिक्त आयुक्त (पू.उप.)** | **बृहन्मुंबई महानगरपलिका आयुक्त** |

**प्रत:-**

**सह आयुक्त / उप आयुक्त (परि-1, 3, 4, 5, 6, 7)**, महोदय,

**सहाय्यक आयुक्त (ए ते टी विभाग)**, महोदय/महोदया,

**अनुज्ञापन अधिक्षक**, महोदय,

**जनसंपर्क अधिकारी**, महोदय,

29/5/2023

**उप आयुक्त (परि.-दोन) यांचे**
**प्रशासकीय अधिकारी**

**प्रत माहितीसाठी:-**

मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचे स्वीय चिटणीस

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) यांचे स्वीय चिटणीस

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पुर्व उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस

मा. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय चिटणीस

२९/५/2023

**उप आयुक्त (परि.-दोन) यांचे**
**प्रशासकीय अधिकारी**